**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाच्या संचालकपदी डॉ.डी.टी. इंगोले रुजु

अमरावती.

प्रो. राम मेघे इन्स्टिटय़ुट ऑफ टेक्नॉलॉजी ॲन्ड रिसर्च, बडनेरा येथील प्राध्यापक डॉ.डी.टी. इंगोले यांची नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक म्हणून निवड झाली असून त्यांनी आपल्या पदाचा पदभार दि. ०२ जुलै, २०१८ रोजी स्वीकारला. याप्रसंगी कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर, प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर, कुलसचिव डॉ. अजय देशमुख यांनी त्यांचे अभिनंदन केले. यावेळी नवनियुक्त परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. हेमंत देशमुख, अधिसभा सदस्य डॉ. प्रदीप खेडकर, विद्यापीठ प्राधिकारिणींचे सदस्य, अभियांत्रिकी महाविद्यालय व इतर महाविद्यालयांतील शिक्षक उपस्थित होते.

डॉ.डी.टी. इंगोले यांनी यापूर्वी प्रो. राम मेघे इन्स्टिटय़ुट ऑफ टेक्नॉलॉजी ॲन्ड रिसर्च, बडनेरा येथे प्राचार्य म्हणून कार्य केले असून व्ही.आर.सी. नागपूर येथून त्यांनी इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरींगमध्ये आचार्यपदवी पूर्ण केली आहे. त्यांना इंडस्ट्री व अध्यापनाचा पस्तीस वर्षाचा अनुभव असून त्यांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील नामांकित शोधपत्रिकांमध्ये शोधनिबंध प्रसिद्ध झाले आहेत. त्यांचे नावावर दोन पेटेन्ट असून यापूर्वी त्यांनी विद्यापीठाच्या सिनेट, बोर्ड ऑफ स्टडी, विद्याशाखेचे अध्यक्ष आदी प्राधिकरणांवर उत्कृष्टरित्या कार्य केले आहे. द इन्स्टिटय़ुट ऑफ इंजिनिअर्स (इंडिया) चे अध्यक्ष व सचिव म्हणून त्यांनी उत्कृष्टरितीने जबाबदारी पार पाडली आहे.

उद्योजकांसाठी पेटेन्ट तसेच नवउद्योजकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन त्यांनी केले आहे. विविध नवसंशोधन संस्थेचे ते सन्माननीय सदस्य व कन्सलटन्ट आहेत. अनेक अभियांत्रिकी व सामाजिक संस्थेवर ते सन्माननीय प्रतिनिधी असून विद्यापीठाच्या माध्यमातून युवकांना संशोधन व उद्योजकतेसाठी चालना देण्यासाठी विशेष विभागातून प्रशिक्षण, राज्यसरकार व केंद्रसरकारच्या विविध योजनांमधून मदत करण्यासाठी ते प्रयत्न करणार आहेत. उच्च विद्याविभूषित, प्रदीर्घ अनुभव असलेले प्राध्यापक, संशोधक विद्यापीठाच्या नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालकपदी निवड झाल्याबद्दल व रुजु झाल्याबद्दल त्यांचे सार्वत्रिक अभिनंदन करण्यात येत आहे.

---

प्रति,	**जनसंपर्क विभाग**
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी	दि. ०३/०७/२०१८.
दै............................... अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी